देशदूत
My जळगाव
। सोमवार, दि. १२ मे २०२५ । पान ४ ।

जाहिरात कात्रण आणल्यास विशेष सूट
भारतातील प्रसिद्धीप्राप्त गुप्तरोग चिकित्सक
लैगींक समस्या, गुप्तरोग
शीघ्रपतन, नपुसंकता, मुल न होणे, शुक्राणूंची कमी आणि मधुमेहाने आलेल्या कमजोरीवर कमी दिवसात खात्रीशीर इलाज केला जाईल.
(टीपः रुग्णालयात येण्याआधी फोन करुन अपॉईंटमेंट घ्यावी.)
(EMD) नकली डॉक्टर केंद्रोंसे सावधान
डॉ.मंशा डिस्पेन्सरी
प्रकाश टॉकीजमागे, बऱ्हाणपूर (म.प्र.) (कॉम्प्युटराईज्ड)
०७३२-५२५१४५९. मोबा.९८२६२७८८७१
भोंदू वैद्यांपासून सावध रहा! । रुग्णालय दररोज सुरु असते. वेळ सकाळी ११ ते रात्री ९
(आपला पत्रव्यवहार किंवा उपचाराची माहिती गुप्त ठेवली जाईल.)



## थोडक्यात...

### उत्कृष्ट कामगिरीबद्दल संतोष रायचंदे सन्मानित



**जळगाव ।** कंजरभाट समाजाचे सामाजिक कार्यकर्ते संतोष गणेश रायचंदे यांनी नॅशनल क्राईम इन्वेस्टीगेशन ब्युरोच्या क्राइम इनफार्मेशन ऑफिसर या विभागात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल लखनऊ येथे झालेल्या नॅशनल क्राईम इन्वेस्टीगेशन ब्युरोच्या राष्ट्रीय अधिवेशनामध्ये वरिष्ठ अधिकारी सुरेश शुक्ला यांच्या हस्ते बेस्ट अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.त्यांच्या या सन्मानाबद्दल नरेश बागडे यांच्यासह समाज बांधवांनी त्यांचे कौतुक केले आहे.

### बुद्ध पौर्णिमेनिमित्त आज रिपाइंतर्फे विविध कार्यक्रम

**जळगाव ।** विश्वाला शांती व अहिंसेचा मार्ग दाखवणारे तथागत भगवान गौतम बुद्ध जयंतीनिमित्त आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(आ.) तर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील समतानगर भागात सकाळी त्रिशरण, पंचशिल ग्रहण, तसेच अभिवादन कार्यक्रम सायंकाळी ६ वाजता खीरदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात अले आहे. कार्यक्रमासाठी उज्वला अडकमोल, योगिता इंगळे, सोनाली अडकमोल, ललिता अडकमोल, कामिनी अडमोल, मनिषा बाविस्कर, लता शिंदे, रेखा अहिरे, प्रताप बनसोडे, राजेश साळुंखे, किरण अडकमोल, हरिष शिंदे, मिलींद अडकमोल परिश्रम घेत आहेत. उपस्थितीचे आवाहन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे महानगर अध्यक्ष अनिल अडकमोल यांनी केले आहे.

### रोटरी मिडटाऊनतर्फे रक्तदान अभियान

**जळगाव ।** येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव मिडटाउनतर्फे ऑपरेशन सिंदूर रक्तदान अभियानांतर्गत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात अध्यक्ष छाया पाटील, प्रेसिडेंट किशोर पाटील, हेमंत पाटील, पूर्वा पाटील, मयुरेश पाटील, पार्थ पाटील यांनी रक्तदान केले. यावेळी राजीव शर्मा, किशोर सूर्यवंशी, जितेंद्र ढाके, डॉ. पंकज शाह, डि. ओ.चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

# बदलत्या हवामानाचा आरोग्यावर परिणाम

## काही वर्षांत उन्हाळ्यात तापमानाचा विक्रमी उच्चांक



गेल्या काही वर्षांत उन्हाळ्याच्या दिवसांत तापमानाने विक्रमी उच्चांक गाठला आहे. विशेषतः शहरी भागातील तापमान आणखी वाढते. या वाढलेल्या उष्णतेचा थेट परिणाम मानवी शरीरावर होतो. उष्माघात, शरीरातील पाण्याची कमतरता , त्वचेच्या समस्या, घामाचे विकार, डोकेदुखी आणि थकवा या स्वरूपात ही लक्षणे दिसून येतात. वृद्ध, लहान मुले आणि हृदय अथवा मधुमेहाच्या रुग्णांसाठी ही परिस्थिती अत्यंत धोकादायक ठरते.

## वातावरणातील बदलाने शारिरीक व्याधींना निमंत्रण

**जळगाव । प्रतिनिधी**





सध्या वातावरणातील बदल कमालीचे त्रासदायक ठरत असून ऊन आणि पावसाचे वारंवार बदलते हवामान मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम करत आहे. तीव्र उष्णतेमुळे उष्माघात, डिहायड्रेशन, त्वचेचे विकार वाढले आहेत. दुसरीकडे, पाऊस व दमटपणामुळे सर्दी, खोकला, ताप, डेंग्यू व मलेरिया यांसारखे आजारांचा धोका बळावला आहे. विशेषतः लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींना या सम-विषम वातावरणाचा अधिकचा त्रास होत आहे.

वातावरणातील हे बदल फक्त शारीरिक नव्हे, तर मानसिक आरोग्यावरही हवामान बदलांचा परिणाम होतो. जास्त उष्णतेमुळे चिडचिड, नैराश्य वाढते. पावसाळ्याच्या दिवसात सूर्यप्रकाशाचा अभाव असल्याने अंगदुखी, घुडघे दुखी, अशक्तपणा अशी लक्षणे सर्रास आढळतात. बहुधा ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि आजारांनी ग्रस्त व्यक्ती हवामानातील बदलांना जास्त त्रास होतो. शारीरिकदृष्ट्या सुदृढ असलेल्यांमध्ये रोगप्रतिकारशक्ती चांगली असल्यामुळे त्यांचा त्रास तुलनेने कमी असतो. तरीही, अधिक तापमान असताना उष्माघाताचा धोका संभवतो. तसेच रक्तदाब वाढणे, हृदयविकाराचा धोका, सांधेदुखी आणि त्वचेचा कोरडेपणा अशा तक्रारी वाढतात. सम विषम वातावरणामुळे आरोग्याच्या समस्या सहज निर्माण होतात. हवामानातील तीव्र बदल ही आता फक्त पर्यावरणीय समस्या न राहता ती आरोग्याशी संबंधित मोठी समस्या ठरत आहे. त्यामुळे नागरिकांनी स्वतःची काळजी घेतली पाहिजे.

## समविषम बदल आरोग्यासाठी चिंतेचे



सध्याच्या हवामानातील सातत्याने होणारे बदल मानवी आरोग्यासाठी चिंतेचा विषय ठरत आहेत. एकीकडे उन्हाच्या तीव्र झळा, तर दुसरीकडे अचानक पावसाचा शिरकाव या दोन्हींचा शरीरावर परिणाम होत असून त्याचे गंभीर दुष्परिणाम आता प्रकर्षाने दिसून येत आहेत. अनपेक्षित अवकाळी पावसामुळे तापमान कमी झाल्यानंतर शरीराला उष्णता निर्माण करण्यासाठी अधिक मेहनत घ्यावी लागते. थंडीमुळे सर्दी, खोकला, दमा, निमोनिया यांसारख्या श्वसनविकारांचे प्रमाण वाढते.

## श्री संत गजानन महाराज मंदिर वर्धापन दिन सोहळा

**जळगाव । प्रतिनिधी**

श्री संत गजानन महाराज मंदिर समिती हरिविठ्ठल नगर तर्फे दि. १३ मे रोजी श्री संत गजानन महाराज मंदिराचा व्दितीय वर्धापन दिन सोहळा साजरा होत आहे. त्या निमित्त महाप्रदाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

१२ रोजी संध्या. ७ ते १० भजन संध्या चे आयोजन करण्यात आलेले आहे. भजन सेवा सौजन्य - गणानाम सत्संग परिवार जळगाव.

१३ मे रोजी सकाळी महाराज्यांचा व पादुकांचा अभिषेक करण्यात येईल.संध्याकाळी ५ वा संतोष बारी यांच्या घरून श्रीच्या पादुकांची मिरवणूक त्यासोबत ग्रंथ दिंडी काढण्यात येणार आहे. दिंडी ७ वा मंदिरावर आल्यावर महाआरती करण्यात येईल लगेचच महाप्रसाद वाटप करण्यात येईल. मंदिर समिती तर्फे अध्यक्ष संदीप महाजन, संतोष महाजन, पंडित बारी, राहुल सोनी, पांडुरंग बारी, साहेबराव मराठे, विनोद बारी, रवींद्र बारी, धनराज बारी, गोपाल धनगर, भरत मिस्तरी, संतोष बारी, गणेश शिंदे, अर्जुन बारी, युवराज बडगुजर, मनोज गजबे, गणेश महाजन, प्रमोद बारी, भूषण भामरे, मयूर सोमानी, प्रवीण सोनावणे, कुंदन बारी परिश्रम घेत आहेत.

# जळगावात शिवसेनेतर्फे तिरंगा रॅली

## सैन्य दलाच्या जवानांचे मनोबल वाढविण्यासाठी उपक्रम

**जळगाव । प्रतिनिधी**



भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीत सैन्य दलाच्या समर्थनार्थ आणि भारतीय जवानांचे मनोबल वाढविण्यासाठी जळगाव जिल्हा शिवसेना तर्फे तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.

भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. भारतीय सैन्य दल आणि भारत सरकारच्या समर्थनार्थ तिरंगा रॅलीचं आयोजन करण्यात आले होते. सदर रॅलीला पांडे चौक येथून भारतमातेच्या प्रतिमेला व शहीद जवान यांच्या प्रतिमेला शिवसेना जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे, उत्तर महाराष्ट्र महिला समन्वयक सरिता माळी-कोल्हे, विधानसभा क्षेत्र प्रमुख शामभाऊ कोगटा, महानगर प्रमुख संतोष पाटील, नगरसेवक कुंदन काळे, शहर प्रमुख गणेश सोनवणे, तालुका प्रमुख शिवराज पाटील, उपजिल्हा प्रमुख अनिल भोळे, स्वप्नील परदेशी, नगरसेविका ज्योती चव्हाण व शिवसेना व युवा सेना पदाधिकारी यांनी पुष्पहार अर्पण करून सुरवात करण्यात आली. सदर सुभाष चौक - टॉवर चौक - नेहरू चौक - छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीजवळ सादर रॅलीचे समारोप करण्यात आला.

### असंख्य नागरिकांचा या रॅलीमध्ये सहभाग

यावेळी रोहित कोगटा, हर्षल मावळे, शैलेश काळे शुभम निकम, अमोल मोरे, जितेंद्र पाटील, संदीप सुरडकर, माजी सभापती जनार्दनआप्पा पाटील, राजेंद्र चव्हाण, महिला शहरप्रमुख शोभाताई चौधरी, भारती रंधे, ममता जंजाळ, रंजना कोळी, भारती म्हस्के, प्रतिभा घोडेस्वार, अनिता कापुरे, शारदा सुरळके, प्रतिभा शिंदे, विजया पांडे, निलू इंगळे, विजया चौधरी, अनुपमा कोल्हे, स्वाती पगारे, ईशा महाजन, सचिन सोनार, सागर हिवराळे, यश सोनवणे, यश पाटील, ॲड.अभिजीत रंधे, विवेक महाजन, हर्षवर्धन राजपूत, गौरव माळी, चेतन कापसे, राहुल नेतलेकर, सोहम विसपुते, रोशन साळुंखे, आदिल झोपे, वैभव सोनवणे, भावेश ढाके, विशाल निकम, दीपक पाटील, दिनेश जगताप, किशोर भोसले, केतन पोळ, विजय लाड, नरेंद्र बोरसे, प्रफुल्ल सरोदे, सचिन महाजन, विजय नारखेडे यांच्यासह आदी युवासेना, शिवसेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. असंख्य नागरिक यांनी या रॅलीमध्ये सहभाग नोंदवून सैन्याला पुढील कारवाईसाठी आम्ही त्यांच्या सोबत आहोत या रॅलीने हे दाखवून दिले. याप्रसंगी शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



# जलदूत म्हणून ना. गिरीश महाजनांची निर्णायक भूमिका; शेतकऱ्यांना लाभ

**जळगाव । प्रतिनिधी**

राज्यातील जलसंपदा धोरणाला एक नवे परिमाण देत, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी तापी महाकाय पुनर्भरण योजनेला दोन्ही राज्यांमध्ये मान्यता मिळवून देत ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. महाराष्ट्र व मध्यप्रदेश सरकारांमध्ये या प्रकल्पासाठी पार पडलेला सामंजस्य करार म्हणजे शेतकऱ्यांच्या समृद्धीचा नवा अध्याय आहे.



ना. महाजन निर्णायक राजकीय नेतृत्व आहे.शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडवणारा टप्पा-या प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील जळगाव, अमरावती, अकोला आणि बुलढाणा, तसेच मध्यप्रदेशातील खंडवा व बुऱ्हाणपूर या जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना दीर्घकालीन सिंचनाचा लाभ मिळणार आहे. नेतृत्वाची दूरदृष्टी, संवादाची ताकद-प्रशासकीय पातळीवरील प्रक्रियांमध्ये गती देणं, तांत्रिक मुद्द्यांवर स्पष्टता आणणं आणि दोन्ही राज्यांत विश्वास निर्माण करणं ही सारी जबाबदारी गिरीश महाजन यांनी स्वतःच्या खांद्यावर घेतली. आणि हा प्रकल्प प्रत्यक्ष निर्णयापर्यंत पोहोचला. स्वप्नपूर्तीचा क्षण हरिभाऊ जावळे यांचे योगदान अमूल्य-या प्रकल्पामुळे प्रेरणास्थान ठरले ते स्व. हरिभाऊ जावळे. उत्तर महाराष्ट्रात जलसमृद्धीच्या स्वप्नासाठी त्यांनी दिलेली दीर्घकालीन लढा, सातत्याने केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेले प्रयत्न आज प्रत्यक्ष साकार झाले आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून त्यांच्या स्वप्नांना मूर्तरूप मिळाले असून, हा क्षण त्यांना वाहिलेली खरा आदरांजली ठरते.

# सेंद्रिय शेतीतील यशस्वी उद्योजक

*(जळगाव येथे जैन हिल्स् परिसरात फालीचे अधिवेशन नुकतेच संपन्न झाले. यातील यशस्वी विद्यार्थ्यांचे क्रमशः मनोगत देत आहोत.)*

## फालीचे फलित



याने फाली (FLI) २०१७ ते २०१८ दरम्यान २ आणि ३ मध्ये भाग घेतला. इंजिनिअरिंग डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर, तो सध्या सेंद्रिय शेतीतील एक यशस्वी उद्योजक झाला आहे. तो सेंद्रिय पद्धतीने शेती करत आहे. त्याने आयटीआय (ITI) चा सिव्हिल इंजिनिअरिंग डिप्लोमा प्राप्त केला आहे.

आविष्कारने २०१९ मध्ये एएम फार्मर ('M² Farmer') नावाने सेंद्रिय शेती उपक्रम सुरू केला, जो स्थानिक ग्राहकांना ताजी उत्पादने वितरीत करतो. आर्थिक वर्ष २०२४ / २५ मध्ये त्याचा नफा ११०.५ लाख इतका झाला असून, सध्या दररोज २०० किलो उत्पादनांची विक्री होत आहे.

आविष्कार आता व्यवसाय विस्ताराच्या तयारीत असून, समविचारी शेतकऱ्यांशी भागीदारी करून काम वाढवण्याचा विचार करत आहे. विक्री वाढवण्यासाठी तो सध्या एक मोबाइल ॲप विकसित करत आहे. २०२३ मध्ये त्याला फाली माजी विद्यार्थी व्हेंचर प्रोग्रॅम (FALI Alumni Venture Program) अंतर्गत ओम्नीव्होर (Omnivore) कडून बीज भांडवल आणि मार्गदर्शन मिळाले. (Omnivore) ११ अधिवेशनात सहभागी होणार आहे.

■ **आविष्कार माळी**
काळेढोण, ता. खटाव, जि. सातारा

## व्यवसाय नियोजन अन् आर्थिक व्यवस्थापन



गौरवने २०१९ ते २०२१ पर्यंत फाली ६ आणि ७ संमेलनांमध्ये भाग घेतला होता. तो सूक्ष्मजीवशास्त्रात बीएससी करत आहे आणि गोदरेज ॲग्रोव्हेट येथे इंटर्नशिप पण करत आहे. तो शेतकऱ्यांना नेहमी मदत करत असतो. फाली (FLI) मध्ये, गौरवने आधुनिक कृषी पद्धती, व्यवसाय नियोजन आणि आर्थिक व्यवस्थापन याबद्दल मौल्यवान ज्ञान मिळवले.

१२ वी पूर्ण केल्यानंतर, गौरवची गोदरेज ॲग्रोव्हेट येथे एका महिन्याच्या इंटर्नशिपसाठी निवड झाली, जिथे त्याने पशुखाद्य विपणन कंपनीचे कामकाज आणि ग्राहक संबंध निर्माण करण्याबद्दल शिकले. या अनुभवामुळे कृषी उद्योगात काम करण्याचे, शेतकऱ्यांना पाठिंबा देण्याचे आणि या क्षेत्राच्या वाढीला हातभार लावण्याचे त्याचे ध्येय दृढ झाले.

■ **गौरव शरद शिंदे**
कासारे, ता. साक्री, जि. धुळे

# कोयता घेऊन दशहत माजविणारे दोघे अटकेत

## गुप्त माहितीद्वारे कारवाई; दोघांविरुध्द गुन्हा दाखल

**जळगाव । प्रतिनिधी**

शहरातील अजिंठा चौफुली परिसरात हाताता लोखंडी कोयता घेवून दहशत माजविणाऱ्या दोन जणांना एमआयडीसी पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून कोयता जप्त केला असून याप्रकरणी एमआयडीसी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एमआयडीसी परिसरात दोन जण कोयता घेवून फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पो.नि.संदीप पाटील यांच्या पथकाने कारवाई करीत संशयित उमेश भगवान जाधव (वय ३३) आणि गणेश भगवान लोहार (वय २७) दोघे राहणार अयोध्या नगर यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडून एक कोयता जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी पो.कॉ. शादाब सैय्यद यांनी फिर्याद दाखल केली. त्यांच्या तक्रारीनुसार उमेश जाधव, गणेश लोहार यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास पो. कॉ. गणेश शिरसाळे करीत आहे.

# गोडावून फोडून लोखंडी प्लेट्सची चोरी

**जळगाव । प्रतिनिधी**

बांभोरी गावाजवळील एका कॉम्प्लेक्स जवळ एका गोडावूनमधून २० हजार रुपये किंमतीच्या लोखंडी प्लेटस् चोरीला गेल्याची घटना शनिवार १० मे रोजी सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी धरणगाव पोलिसात दुपारी तीन वाजता दोन संशयित आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघ संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# साखरपुड्यातून सैनिकांसाठी मदतीचा हात

## साखरपुड्यातील १ लाख २ हजार भेट सशस्त्र सेना ध्वज दिन निधीला

**जळगाव । प्रतिनिधी**



राष्ट्रसेवेचा वारसा हा फक्त गणवेशापुरताच मर्यादित न ठेवता, तो जीवनपद्धती म्हणून जपणारे आणि पुढील पिढीकडे सुपूर्त करणारे माजी सैनिक प्रविण संतोष पाटील (रा. शिवराणा नगर, पिंप्राळा) यांनी एक अनोखा आदर्श निर्माण केला आहे.

त्यांच्या कन्या चि. सौ. कां. प्रियंका यांचा साखरपुडा ११ मे रोजी पार पडला. या समारंभात आलेली भेट स्वरूपातील एकूण १ लाख दोन हजार एवढी रक्कम त्यांनी संपूर्णपणे शसस्त्र सेना ध्वजदिन निधीत स्वेच्छेने देऊन... राष्ट्रप्रेमाचं अनोख उदाहरण घालून दिले आहे. देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या वीर जवानांच्या सेवेसाठी काहीतरी योगदान दिले पाहिजे, या विचारातून पाटील कुटुंबीयांनी घेतलेला हा निर्णय समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या या राष्ट्रभक्तीच्या कार्याची दखल घेत जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर डॉ.निलेश पाटील यांनी त्यांना सन्मानपूर्वक पावती प्रदान केली. यावेळी त्यांनी नवदांपत्याला पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देतानाच, समाजातील प्रत्येकाने आपल्या सामर्थ्यानुसार शसस्त्र सेना ध्वजदिन निधीत सढळ हस्ते योगदान द्यावे, असे आवाहन केले.

या कार्यासाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी त्यांचे अभिनंदन केले. 'सुखाचे क्षणही देशासाठी' समर्पित करता येतात, हा संदेश सर्वदूर पोहचावा, असाच आहे.

# श्री संत छोटे सरकार यांचे उद्या जळगाव येथे आगमन

**जळगाव । प्रतिनिधी**

श्री गुरुदेव संत छोटे सरकाराजी यांचे आगमन दि. १३ मे मंगळवार रोजी जळगाव येथे होत आहे श्री दादाजी दरबार खेडी, जळगाव येथे गुरुदेवांच्या आगमनानिमित विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

जळगाव - भुसावळ राष्ट्रीय महामार्ग वरील खेडी पेट्रोल पंप समोरील श्री दादाजी दरबारात विविध कार्यक्रम होणार आहे. दि १३ मे मंगळवार रोजी सायंकाळी ५ वाजता श्री गुरुदेव छोटे सरकार यांचे आगमन होत आहे, श्री गुरुदेवांचे आगमना नंतर त्यांचे पाद्यपूजन केले जाईल.

श्री गुरुदेव श्री दादाजी दरबार मधील गर्भ गृहात जाऊन, श्री सदगुरू धुनिवाले दादाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करतील.कर्पूर आरती होईल, यानंतर श्री संत छोटे सरकार आसनस्थ होतील. भक्त मंडळी त्यांचे पूजन, दर्शन करून आशीर्वाद घेतील. भक्तजनाचे दर्शन, पूजन झाल्या नंतर श्री गुरुदेव छोटे सरकारजी मार्गदर्शन करून सत्संग करतील. रुद्राष्टक, नर्मदाष्टक, शिवतांडव स्त्रोत्र, शिव महिम्न होईल, यानंतर प्रसादाचे वाटप होईल, श्री दादाजी दरबार खेडी ला १९ वर्षे पूर्ण होत आहे, या दादा दरबार ची निर्मिती श्री संत छोटे सरकार यांनी संगम मरमरी या दगडात केली आहे, श्री सरकाराजी यांनी स्वःता हे बांधकाम करून दिले आहे.

श्री संत छोटे सरकार यांच्या दर्शनाचा लाभ सर्व भाविकांनी येऊन घ्या, असे आवाहन अध्यक्ष श्री .पी . इ . तात्या पाटील व बाजीराव पाटील यांनी केले आहे .

cmyk